**L. A. BILL No. XXXVI OF 2021.**

A BILL

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA AGRICULTURAL PRODUCE MARKETING (DEVELOPMENT AND REGULATION) ACT, 1963.

**सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३६.**

**महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

**(विधानसभेने दिनांक २८ डिसेंबर २०२१ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

**(विधानपरिषदेने दिनांक २८ डिसेंबर २०२१ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

१९६४ चा महा. २०.

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३, यामध्ये आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या बाहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

**१.** या अधिनियमास, महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) अधिनियम, २०२१, असे म्हणावे. संक्षिप्त नाव.

सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या कलम १३ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ (यात यापुढे ज्याचा निर्देश " मुख्य अधिनियम " असा केला आहे), याच्या कलम १३ मधील, पोट-कलम (१), खंड (अ) मधील, उप-खंड (एक) मध्ये " त्याखाली केलेले नियम यांच्या अर्थांतर्गत असलेल्या " या मजकुरानंतर " ज्या त्यांच्या सदस्यांना पीक कर्ज संवितरित करतात, " हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल. १९६४ चा महा. २०

सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या कलम १५अ ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम १५अ मधील, पोट-कलम (१) मधील, खंड (ब) मध्ये, " प्रशासक मंडळ हे, " या मजकुराऐवजी " सात सदस्यांपेक्षा अधिक नसणारे प्रशासक मंडळ हे, " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या कलम ३१ ची सुधारणा.

**४.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३१ मधील, पोट-कलम (१) नंतर, पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात येईल :—

" (१अ) बाजार समिती, ती ठरवील त्या दराने, अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट नसलेल्या कृषि उत्पन्नाचे किंवा अकृषि उत्पन्नाचे पणन करण्यासाठी, बाजार क्षेत्रात बाजार समितीद्वारे पुरविलेल्या कोणत्याही ठिकाणाच्या किंवा सुविधेच्या वापरासाठी, व्यापारी, अडत्या, दलाल, प्रक्रियाकार, वखारवाला किंवा इतर कोणतीही व्यक्ती अशा कोणत्याही बाजार कार्याधिकाऱ्याकडून, संचालकाच्या पूर्वमान्यतेने, वापरकर्ता आकार बसवण्यास आणि तो वसूल करण्यास सक्षम असेल. ".

सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या कलम ३४अ ची सुधारणा.

**५.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३४अ मध्ये,—

(एक) पोट-कलम (१) मधील, " त्याच्याकडून नेमण्यात येईल अशा कर्मचारीवर्गाच्या " हा मजकूर वगळण्यात येईल ;

(दोन) पोट-कलम (२) मधील, " पाच पैसे " या मजकुराऐवजी " दहा पैसे " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या कलम ३५ ची सुधारणा.

**६.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३५ मधील, पोट-कलम (१) मध्ये, दुसऱ्या परंतुकाऐवजी, पुढील परंतुक दाखल करण्यात येईल :—

" परंतु आणखी असे की, बाजार समितीद्वारे, विहित करण्यात येतील अशा अटी व शर्तींवर आणि रीतीने, संचालकांच्या पूर्व मान्यतेने सचिव व इतर अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना, नियुक्त करण्यात येईल.".

सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या कलम ३५अ ची सुधारणा.

**७.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३५अ मध्ये " सहायक निबंधक, सहकारी संस्था " या मजकुराऐवजी " सहकार अधिकारी, श्रेणी-दोन " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या कलम ४५ ची सुधारणा.

**८.** मुख्य अधिनियमाच्या कलम ४५ मधील, पोट-कलम (२) मधील खंड (क) मध्ये, " प्रशासक मंडळाची " या मजकुराऐवजी, " सात सदस्यांपेक्षा अधिक नसलेल्या प्रशासक मंडळाची " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या कलम ५७ ची सुधारणा.

**९.** मुख्य अधिनियमाच्या कलम ५७ मध्ये,—

(एक) पोट-कलम (३) मध्ये, " पोट-कलम (२) च्या अर्थानुसार " या मजकुरानंतर, " राज्य पणन मंडळास किंवा " हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल ;

(दोन) समास टीपेमध्ये, " सरकारला किंवा " या मजकुराऐवजी, " सरकारला किंवा राज्य पणन मंडळाला किंवा " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

**१०.** मुख्य अधिनियमाच्या कलम ६० मधील, पोट-कलम (२) मधील खंड (ग) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :— सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या कलम ६० ची सुधारणा.

" (ग-१) कलम ३५ च्या पोट-कलम (१) च्या दुसऱ्या परंतुका अन्वये, बाजार समितीचा सचिव आणि असे इतर अधिकारी व कर्मचारी यांच्या नेमणुकीच्या अटी व शर्ती आणि रीत विहित करणे.".

(शा.म.मु.) एचबी १८६१–२ (५००-१२-२०२१)

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[ सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३६. ]**

**[ महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.]**

**[ श्री. बाळासाहेब पाटील,**
पणन मंत्री. **]**

**[ विधानसभेने दिनांक २८ डिसेंबर २०२१ रोजी संमत केल्याप्रमाणे.]**

**[ विधानपरिषदेने दिनांक २८ डिसेंबर २०२१ रोजी संमत केल्याप्रमाणे.]**

**राजेन्द्र भागवत,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई